**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात (न्यायालय क्र.६६)</u>**

**<u>जामीन अर्ज क्र. ६११/२०२६</u>**

**<u>गुन्हा रजि.क्र. ३४५/२०२६</u>**

**<u>आदेश</u>**

१. आरोपी अब्बास जाफरी उर्फ इराणी उर्फ सययद याने प्रस्तुतचा अर्ज जामीन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जाला अनुसरुन सरकारी वकील व तपासिक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

२. सदरहू अर्जाला अनूषंगून मुळ केसचे अवलोकन केले. आरोपी यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीविरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप गंभीर आहे. तसेच सदरहु केसमध्ये चोरण्यात आलेली चैन अगर त्याचे पैसे आरोपीकडून अदयाप प्राप्त करण्यात आलेले नाही. तसेच पोलीसांनी दिलेल्या अहवालावरुन आरोपीविरुध्द अश्याच आशयाचे एकूण ७ गुन्हे प्रलंबित आहेत असे दिसून येते. सदरहु केसमध्ये आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. अशा परिस्थितीत जर आरोपीचा जामिन अर्ज मंजुर केला तर केसमधील तपासकामात अडथळे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरोपीला जामिनावर मुक्त केल्यास आरोपी अशाच स्वरूपाचे गुन्हे पुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब आरोपीविरूध्द असणा—या गंभीर स्वरूपाच्या केसचा विचार करता, आरोपीचा जामिन अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते.

**सबब आदेश खालिलप्रमाणे—**

आरोपी अब्बास जाफरी उर्फ इराणी उर्फ सययद यांचा जामीनअर्ज फेटाळण्यात येत आहे.

दिनांक : १७.०६.२०२६

17/06/2026

(अ. अ. मेहेंदळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.
प्रभारी ४४वे न्यायालय, अंधेरी,